International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly

ISSN – 2347-7075
Impact Factor –7.328
Vol.2 Issue-11 May- June 2022

# International Journal of Advance and Applied Research (IJAAR)

*A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal*

*May-June Volume-2 Issue-11*

*On*

Chief Editor
P. R. Talekar
Secretary
Young Researcher Association, Kolhapur (M.S), India

Editor
Dr. R.R.Jane
Principal
Arts and Commerce College,
Bhisi Tah- Chimur Dist-Chandrapur

Co- Editor
Dr. N.S. Girde
Assistant Professor & Head Dept. of History

*Published by- Young Researcher Association, Kolhapur (M.S), India*

The Editors shall not be responsible for originality and thought expressed in the papers. The author shall be solely held responsible for the originality and thoughts expressed in their papers.

© All rights reserved with the Editors

Assistant Professor
...manya Mahavidyalaya, Warora

| | | |
|---|---|---|
| 24 | ग्रामीण समाजातील महिलांच्या सक्षमीकरणात स्वयं सहायता बचत गटाची भूमिका<br>कु .अनिता उदेभान बन्सोड | 66-68 |
| 25 | कृषी पर्यटन – व्यवसाय संधी<br>प्रा. डॉ. शितोळे अनिल विजय ,गायकवाड प्रतिभा शिवाजी | 69-71 |
| 26 | महिलांच्या विविध चळवळी व त्यांचे सक्षमीकरण<br>कु. संजीवनी हरिदास पाटील | 72-74 |
| 27 | महिला सक्षमीकरणासाठी लिंगभाव संवेदनशीलतेची आवश्यकता<br>विशाल सुरेश सपकाळे | 75-77 |
| 28 | महिला सबलीकरण : काळाची गरज<br>डॉ. लिलाधर डी. खरपुरिये | 78-79 |
| 29 | आधुनिक काळातील समाजकार्य करणाऱ्या महिलांचे सक्षमीकरण<br>मीना संतोषराव फुले | 80-83 |
| 30 | आधुनिक काळातील सुशिक्षीत महिलांचे सक्षमीकरण<br>कु. शुन्यता मधुकर सावंत | 84-85 |
| 31 | 'महिला सशक्तीकरण और राजनितिक विकास' एक अध्ययन<br>प्रा. डॉ. प्रगती दिनेश नरखेडकर | 86-88 |
| 32 | पुरूष प्रधान संस्कृती व महिलांचे सक्षमीकरण<br>कु. द्वारकादास रंगनाथ राकडे | 89-90 |
| 33 | पुरूषप्रधान संस्कृती व महिलांचे सक्षमीकरण<br>अशोक भीमराव वाघमोडे | 91-92 |
| 34 | आधुनिक काळातील ग्रामीण महिलांचे सक्षमीकरण<br>छाया शिवाजी सौंदरमल | 93-95 |
| 35 | राजकीय कार्य क्षेत्रातील महिला सशक्तीकरण<br>लिमंत्रिका भगवान नवघडे, प्रा. डॉ. एल. एच. नंदेश्वर | 96-98 |
| 36 | महिला सशक्तीकरण : एक पारदर्शी दृष्टीकोण<br>कु. चंद्रकला शालिकराम गजभिये | 99-100 |
| 37 | कामकाजी महिलाओं की सामाजिक प्रस्तिथि में परिवर्तन<br>सौम्या बर्नवाल | 101-104 |
| 38 | महिला उद्योजकासमोरील समस्या व उपाय<br>प्रा.डॉ. रसाळ दैवशाला चत्रभुज, प्रा. केळे एच.व्हि | 105-107 |
| 39 | स्त्रीवादी साहित्य : एक विवेचक अभ्यास<br>श्री. चेपूरवार गंगाधर नरसिंगराव | 108-110 |
| 40 | भारतात स्पोर्ट्स क्षेत्रात करिअर करण्यास महिलानाप्रेरणा<br>डॉ. दीपक वसंत चव्हाण | 111-113 |
| 41 | आधुनिक काळातील सुशिक्षित महिलांचे सक्षमीकरण<br>डॉ.मोनाली यशवंत बहादूरे | 114-116 |
| 42 | पंचायतीराज में महिला नेतृत्व<br>डॉ निखत खान | 117-118 |
| 43 | भारतीय स्वतंत्रता आंदोलन में महिलाओं की भागीदारी<br>श्रीमती कांता वर्मा | 119-122 |
| 44 | भारतीय स्त्रियांची स्थिती : दशा व दिशा<br>प्रा.डॉ. आनंद के. भोयर | 123-125 |
| 45 | चंद्रपूरची महाराणी हिराई : कार्य व कर्तुत्व<br>प्रा. डॉ. दीपक पा. लोणकर | 126-129 |
| 46 | महाराष्ट्रातील आदिवासी महिला व राजकीय परिस्थिती<br>प्रा डॉ. अजय वसंतराव गव्हाणे प्रा.भागवत शंकर महाले | 130-133 |
| 47 | महिला सबलीकरण :– एक चिंतन<br>डॉ.रामकृष्ण जी. टाले | 134-136 |




Scanned with OKEN Scanner

International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly

ISSN – 2347-7075
Impact Factor –7.328
Vol.2 Issue.11 May-June 2022

# चंद्रपूरची महाराणी हिराई : कार्य व कर्तुत्व

प्रा. डॉ. दीपक पा. लोणकर
लोकमान्य महाविद्यालय, वरोरा जि. चंद्रपूर (महा.), पिन 442907
Email - deepakmd.lonkar@gmail.com

**प्रस्तावना –**

देशाच्या इतिहासात पुरुषाप्रमाणेच स्त्रीयांनीही महत्वाचे योगदान दिले व आपले राज्य स्थापण केले. उदा. रजिया सुल्ताना, झासीची राणी लक्ष्मी बाई, अहिल्याबाई होळकर इ. अनेक पराक्रमी व कर्तुत्ववान स्त्रीयांचा उल्लेख करता येईल यापैकीच एक म्हणजे चंद्रपूरच्या इतिहासात दुर्लक्षित राहिलेली महाराणी हिराई.

हिदुस्थानच्या इतिहासात अनेक प्रकारची घराणी नावारुपास आली. त्यातीलच एक मध्यप्रदेशातील गोंडराजवट होय. या गोंडाचे राज्य मध्यप्रदेशातील गढामंडला, खेरला, देवगढ व चंद्रपूर येथे होते[1]. त्यापैकी चंद्रपूर सोडून बाकी तीन्ही ठिकाणीच गोड घराणे लवकरच लयाला गेली. परंतु चंद्रपूरची गोंड राजवटही (1247-1751) पर्यत जवळपास 500 वर्षे टिकून होती 1247 मध्ये आध्रप्रदेशातील शिरपूर येथे राजा भिमबल्लाळ सिंह यांनी गोंड राजवटीची स्थापणा केली.[2] पुढे त्याच्या वंशातीलच खांडक्या, बल्लाळशहा याने 1480 मध्ये चंद्रपूरचा 12 किमी चा परकोट तयार केला.[3] पुढे शिरपूर वरुन गादीचे स्थलांतर बल्लारपूर या ठिकाणी करण्यात आले. परंतु हेही ठिकाण सोयीचे न वाटल्यामूळे खांडक्या बल्लाळशहाचा मुलगा हिरशहाने (1497-1522) चंद्रपूर येथे गादीचे स्थलांतर केले.[4]

पुढे चंद्रपूर गादीवर आणखी सात शासक येऊन गेले. रामसिंग हा 1667 ते 1684 पर्यत राजगादीवर होता. त्यांनी मोगलांचे अधिपत्य नाकारुन मोगल सम्राट औरगजेबाला खंडणी देण्याचे नाकारले व बादशहाविरुध्द विद्रोह केला बादशहाने रामसिंगावर मोगली फौज पाठवून त्याला पराभूत केले व युध्दात ठार केले[5] व त्याचे राज्य राजा किशनसिंहास देऊन त्याला राहजसिंहासनावर 31/12/1684 मध्ये बसविले. तसेच राजपत्र व एक हत्ती पाठवून किशनसिंगाचा सन्मानही केला.[6] (राजा रामसिंग निपुत्रित होता म्हणून सरदार किशनसिह यांना राजा म्हणून बादशहाने चंद्रपूरच्या गादीवर बसविले होत) किशनसिहाला दोन राण्या असून पाहिल्या पत्नी पासुन बीरसिह तर दुसरी पत्नी इस्मामबाई हिच्यापासून कालसिह उर्फ कोकमानसिह व मोहनाबाई उर्फ मोमयानाबाई हे संतान प्राप्त झाली.[7] पुढे किशनसिंहाचा जेष्ठ पुत्र त्याच्या मृत्युनंतर बीरसीह हा (1696-1704) हा राजा बनला.[8] तो 8 वर्षाचा असतांना मदनापूर होंशगाबाद येथील सरदार ढिल्लनसिंह यांची मुलगी हिराई हिचाशी विवाह झाला होता.[9]

**उद्दीष्टे**

1) राणी हिराईचे कर्तुत्व समजून घेणे.
2) गोंड-मराठा संबधाचा आढावा घेणे
3) गोंड-मोगल संबधाच आढावा घेणे
4) गोंडकालीन स्थापत्य कलाचा आढावा घेणे

**गृहित्के –**

1) राणी हिराई कर्तुत्वान स्त्री होती.
2) राणी हिराईने जनकल्याणाकारी कार्य केले.
3) राणी हिराईने सम्माजीक बांधीलकी जोपासली.

**संशोधन पध्दती –**

इतिहास लेखन पध्दतीच्या माध्यमातून अभ्यासकरुन वर्णनात्मक पध्दतीचा वापर केला जाईल तसेच सर्वेशन पध्दतीचा वापर करुन राणी हिराईच्या संदर्भातील माहिती गोळा केली जाईल.

**पुर्वायुष्य**

राणी हिराईचे मूळ नाव गंगाबाई हे असून ती होशगाबाद येथील सरदार ढिल्लनसिह मडावी यांची मुलगी होती.[10] ती लहानपणापासुनच हुशार व कुशाग्र बुध्दीची, दिसायला सुंदर असून वयाच्या सहाव्या वर्षीच तीचा बालविवाह राजा किशनसिहाचा मुलगा बीरसिह यांच्याशी करण्यात येऊन विवाहानंतर गंगाबाईचे नामकरण हिराई असे ठेवले गेले.[11] तीने लहानपणीच लष्करी व राज्यकारभाराचे शिक्षण घेतले होते. राजा बीरसिग हा वयांच्या 15 व्या वर्षी गादीवर बसला पुढे या दांपत्याला एक मुलगी (मानकुंवर) झाली. तीचा विवाह देवगडचा गोंडशासक दुर्गमशहा याचेही लावून दिला गेला होता.[12]

राणी हिराईला पुत्र संतान नसल्यामुळे राजगादीला वारस मिळण्यासाठी तिने दूरदर्शीपणाचा विचार करुन राजा बीरसिहाला दुसरा विवाह करण्याची सहमती दिली. त्यामुळे राणी हिराईच्या आग्रहाखातर राजा बीरसिहाने औधीगड बाजागडच्या मडावी जमीनदार घराण्यातील कन्येशी विवाह केला. तेव्हा हा विवाह सोहळा पार पडत असतांनाचा हिरामण नावाच्या सरदाराने राजा बीरसिहचा खून केला.[13] त्यामुळे राणीला दुःख झाले. तेव्हा राणीला मुलगा नसल्यामुळे हिराईने चंदनखेडा घराण्यातील आपला चुलत दिर गोविंदशहा याचा 3 वर्षाचा मुलगा दत्तक घेऊन त्याला चंद्रपूरच्या गादिवर बसविले व त्याचे नामकरण राजा रामशहा असे ठेऊन राज्यकारभाराची संपुर्ण सत्तासुत्रे राणी हिराईने आपल्या हाती घेतली व ती चंद्रपूर गादीचा राजकारभार सांभाळू लागली.[14]



Scanned with OKEN Scanner

**राणीच्या प्रयत्नाने राजा बीरसिहाची सुटका :-**

राजा बीरसीह व त्याचे वडील किशनसिह व त्याचे पुर्वज हे मोगलांचे मांडलीक असल्यामुळे मोगलांनी दरवर्षी निश्चित केलेली खांडणी मोगलाच्या खजिण्यात भरावी लागे. ती खंडणी राजाने मोगलाकडे जमा केली नाही. तसेच राजा बीरसीहाला औरंगजेबाने नेकनाम खान उर्फ कालसिह याला अर्धे राज्य देण्यास सांगितले असता बीरसिहाने औरंगजेबाच्या आदेशाची अवमानना करुन टाळाटाळ केली. तसेच बीरसिहाने छत्रपती राजारामाला पकडण्यासाठी गेलेल्या मोगली सरदाराविरुध्द कट केला होता.[15] वरील सर्व कारणामुळे औरंगजेबानी सरदार अलीमर्दान खानास बीरसीहास कैद करुन शिक्षा करण्याचा आदेश दिला त्यामुळे बीरसीहास पकडून पवनार येथे कैद करण्यात आले.[16]

तेव्हा राजा बीरसिहाला औरंगबादला औरंगजेबाकडे पाठविण्याच्या आधीच आपण राजाची सुटका केली पाहिजे या विचारातून राणीने मंत्रीमंडळाची बैठक बोलावून त्यात राजाचा सुटकेसाठी खल केला व स्वत: मुत्सद्देगीरीने वागून राजाला आपल्या अक्कल हुशारीने सोडवून आणले. याप्रसंगी राणीने पाठविलेल्या माणसांना बादशहाच्या अधिकाऱ्यांना पकडता आले नाही.[17] अशाप्रकारे आपल्या बुध्दीचातुर्याने व मुत्सद्देगीरीच्या जोरावर राणी हिराईने औरंगजेबाच्या सैन्यावर मात करीत मोगलांच्या तावडीतून राजा बीरसीहाला सहीसलामत सोडवून आणले.

**नेकनामखान उर्फ कालसिहचा पराभव**

राजा बीरसिहाचा सावत्र भाऊ कालसिंह हयाने औरंगजेबाचा सांगण्यावरून धर्मातर करुन नेकनामखान हे नाव धारण केले होते. तो देवगढचा राजा होता.[18] त्याने औरंगजेबाच्या मदतीने चंद्रपूरच्या गादीवर आपला अधिकारसांगून राजा बीरसीहाकडे अर्धे चंद्रपूरचे राज्य मागितले होते. परंतु बीरसिंहाने ते दिले नव्हते. त्यामुळे पुढे नेकनामखानाने बीरसीहाच्या मृत्युनंतर राणी हीराईकडे पुन्हा राज्याची मागणी केली. तेव्हा राणी हिराईने नकार देताच नेकनामने चंद्रपूरावर स्वारी करण्याची योजना आखली तेव्हा ही माहिती गुप्तहेरामार्फत राणीला मिळाली म्हणून तीने साताराचे मराठ्याचे छत्रपती शाहू यांना मदत मागितली.[19] तेव्हा शाहूने मालोजी नेमानी शिंदे यास मदत देऊन पाठविले. राणी हीराईनेही युध्दाची तयारी करुन ती मराठा सैन्याच्या मदतीने नेकनामखाना विरुध्द स्वत: युध्दात उतरली. व नेकनाम खानाचा रामबाग जवळे झालेल्यायुध्दात पराभव केला.[20] त्यामुळे नेकनामखान पळून जाण्याच्या विचारात असतांनाच त्याल कैद करुन चंद्रपूरला ठेवले. या युध्दाप्रसंगी राणीने नेकनामाची सरद पुरवठा तोडून त्याची ताकद कमी केली होती. हे युध्द 1708 ला केव्हातरी झाले असावे.[21] एका स्त्रीच्या हातून झालेला पराभव नेकनामखानास आवडला नाही. म्हणून त्याने कैदेत असतांना राणी हीराईच्या सैन्यांना लाच देऊन स्वत:ची सुटका करुन घेतली व पुन्हा सैन्य जमवून मराठा सेनापती मालोजी शिंदेला एकट्याला गाठून ठार केले व तो देवगडला पळून गेला.[22]

**रावमानसिगाची चंद्रपूरवर स्वारी : (1708-09)**

राणी हिराईने मोगली सेन्याच्या तावडीतून आपल्या पतीची सुटका केली होती. तसेच तीने औरंगजेबाच्या काळात गोबंदी करुन[23] नेकनाम खानासही अर्धा हिस्सा दिला नव्हाता व ती मोगलांचे माडलीकत्व झुगारुन देण्याच्या तयारीत होती. त्यामुळे औरंगजेबाला राणी हिराईला धडा शिकवायचा होता म्हणून त्याने चंद्रपूर राज्यातील माणीकगड तसेच माहूरगड हे दोन परगणा परस्पर रावमानसिह जाधव या सरदारास बहादुरीबाबत देऊन टाकला होता.[24] वास्तविक माणिकगड परगणा हा चंद्रपूर राज्याचा भाग होता. तरीही औरंगजेबाने तो भाग रावमानसिगाला बक्षिस म्हणून दिला होता.

त्यामुळे रावमानसिह हा माहुरगढ व मानिकगड हे दोन प्रदेश आपल्या ताब्यात घेण्यासाठी त्याने चंद्रपूरवर स्वारी करण्याची योजना आखली व तो मानिकगडच्या भागात ससैन्य पोहचला व किल्यावर स्वारी केली.[25]

मानिकगड हा किल्ला समुद्र सपाटीपासून 2000 फुट उंचीवर असून तो इ.स. 9 व्या शतकात नागवंशीय माना राजांनी बांधला असून हा डोंगरी किल्ला होता.[26] नेकनामा सोबतच्या संघर्षानंतर राज्यात आर्थिक टंचाई निर्माणा झाल्यामुळे या किल्लावर लष्करी कुमक फार कमी होती तसेच मराठा सरदार कान्होजी भोसले यांची स्वारी चंद्रपूरवर होणार असल्याची गुप्त बातमी राणी हिराईला कळल्यामुळे चंद्रपूरला जास्तीचे राखीव सैन्य ठेवल्या गेले. त्यामुळे माणीकगडच्या किल्लावर सैनिक कुमक कमी होती याचा फायदा रावमानसिहाला मिळून राणी हिराई विरुध्द झालेल्या माणीकगडच्या युध्दात राजा रावमानसिहला विजय मिळाला परंतु किल्लातील खजीना मात्र त्याच्या हातीलागला नाही.[27]

माणिकगडच्या युध्दात राजा रावमान सिहाने बरेचसे नुकसान होऊन सैनीक व आर्थिक हानी बरीच झाली. या लढाईसाठी त्याच्यावर 50 लाख रुपयाचे कर्ज झाले होत. पुढे किल्लाच्या सरक्षणासाठी रावमानासिहाने आपले काही सैन्य माणीकगढावर ठेऊन तो परत आपल्या राज्यात निघून गेला.[28] परंतु परत पुन्हा तो किल्लाच्या व्यवस्थेसाठी आला नाही तसेच सैन्यही पाठविले नाही. याचा फायदा घेऊन राणी हिराईने किल्लावर नरसिंग टाकूर यास आक्रमण करण्यास सांगून किल्ला ताब्यात घेतला व रावमानसिगाच्या सैन्यास हाकलून लावून तिथे आपली व्यवस्था कायम केली. तसेच किल्लाची दुरुस्ती करुन 2 तोफाही बसविल्या अशा प्रकारे माणिकगड किल्ला व परगणा राणी हिराईने परत घेतला.[29]

**कान्होजी भोसल्याचा पराभव :- (1710-11)**

छत्रपती शाहू ने परसोजी भोसलेचा मुलगा कान्होजी भोसले याला वडीलांच्या मृत्युनंतर 'सेना साहेब सुभा' हा किताब 31 मार्च 1710 रोजी देऊन वऱ्हाड व गोंडवनच्या भागात चौथाई व सरदेशमुखीचा अधिकार त्याला दिले होते.[30] तसेच राणी हिराईने नेकनामखान सोबत झालेल्या युध्दात मराठ्यांनी मदत केली तरी त्यांचा युध्दाच्या खर्चाचा वाटा अजून पर्यंत दिला नव्हता. म्हणून शाहूने चंद्रपूरवर स्वारी करण्यासाठी सेनासाहेबसुभा कान्होजी भोसले याला सांगितले व त्याच्या मदतीस सरलष्कर हैबतराव निबाळकर यांना पाठविले.[31]

ही माहिती हिराईला गुप्तहेरामार्फत कळताच तिनेही मराठ्याना टक्कर देण्याचे ठरवून सैन्य उभे केले व सेनापती परशा (परशुराम) यांच्या नेतृत्वात सैन्य जमविले.[32] युध्दाआधी वाटीघाटी करण्याचा प्रयत्न झाला असता त्या फिस्कटल्या त्यामुळे प्रत्यक्ष रामबागेच्या मैदानावर युध्द घेऊन त्यात सेनापती हैबतराव निबाळकर मारल्या गेला. यामुळे मराठा सैन्य पळायला लागले. कान्होजीन सैन्याला थांबविण्याचा प्रयत्न केला असता तो असफल होऊन कान्होजीचा या युध्दात राणी हिराई कडून पराभव झाला. व तो पळून गेला.[33]

**कान्होजीची दुसरी स्वारी (1715)**

परंतु एका स्त्रीच्या हातून आपला पराभव व्हावा ही गोष्ट कान्होजीच्या जिव्हारी लागली व तो बदला घेण्याच्या विचारात होता तेव्हा त्याने 1714 मध्ये राणीकडून खंडणीवसूल करण्यासाठी व पराभवाचा बदला घेण्यासाठी चंद्रपूरवर आक्रमण केले या वेळी राणीला युध्दाची तयारी करण्यास वेळ न मिळाल्यामुळे तीचा या युध्दात पराभव झाला व अर्ध राज्य राणीला गमवावे लागले.[34]

**सुलतान निबाळकरची स्वारी :-**

राणी हिराईकडून हैबतराव निबाळकर हा मराठ्यांचा सेनापती मारला गेल्यामुळे त्याचा बदला घेण्यासाठी हैबतरावाचा मुलगा सुलतानजी याला 'सरलष्कर' हा खिताब देऊन शाहूने राणी हिराईविरुध्द त्याला पाठविले. तेव्हा त्याने विसाजी रघूनाथ यांच्या मदतीने चंद्रपूरवर स्वारी करुन राणी हिराईचा पराभव केला. त्यामुळे मराठा सरदार शामराव पिलाजी यांच्या बरोबर राणील तह करावा लागला.[35] व चंद्रपूरचे राज्य सातराच्या मराठ्यांचे मांडलीक झाले. राणीचा दत्तक मुलगा रामशहा यास तुरा व वस्त्रे दिला गेली. तसेच राणी कडून खंडणी व युध्दाचा खर्च वसुल केला गेला.[36]

**राणी हिराईची इतर कामगीरी**

**1) जावयाचा पराभव/वध :-**

राणी हिराईचा विरोध हा स्वकीयाशीच होता. राजा बीरशहाचा स्वातंत्र भाऊ नेमनामखान या स्वकीयाचा पराभव राणीन केला होता.[37] तसेच राणीचा जावई व मुलगी मानकुवरचा पती राजा दुर्गमशहा याने राणीचा व मुलीचा अपमान केला व मुलीला माहेरी पाठविले म्हणून त्याचा बदला घेण्यासाठी राणीने महाकाली देवी समोर जावयाचे मुंडके कापून आणून तुला चढवेल अशी शपथ घेतली.[38] व ती पुर्ण करण्यासाठी खांबाडा येथे झालेल्या युध्दात जावयाचा पराभव करुन त्याच मुंडके कापून ते देवीला अर्पन केले.[39]

**2) अर्धे राज्य परत मिळविले :-**

कान्होजी भोसल्याकडून 1715 मध्ये पराभव झाल्यानंतर राणीला आपले अर्धे राज्य मराठ्यांना द्यावे लागले होते तेव्हा राणी हिराईने याबाबत चंद्रपूरचा मराठ्याचा वकील बाजीराव महादेव यांच्या मार्फत छत्रपती शाहूशी बोलनी करुन वाटाघाटी सुरु ठेवल्या. तेव्हा छत्रपती शाहूचे मन वळविण्यात यश येऊन राणीचे अर्धे राज्य परत करण्याचे मान्य केले.[40] तेव्हा पेशवा बाजीराव पहिला यास 11 मे 1722 रोजी चंद्रपूरला नजराना घेऊन पाठवून चंद्रपूरचे अर्धे राज्य परत केले तसेच या संदर्भात कोणीही हस्तक्षेप करुन नये अशी ताकीदही शाहुने इतरांना दिली.[41]

**3) गोवध बदी कायदा**

राणीचा पती व पुर्वज हे मोगलांचे मांडलीक होते. त्यामुळे त्यांना दरवर्षी मोगलांना कर द्यावा लागत. या मोगल राज्यात गोवध बंदी कायदा नव्हता. गाय बैलाची सर्रास कत्तल केली जात. तेव्हा गाय ही हिंदुना पवित्र असल्यामुळे राणी हिराईने मोगलांचे मांडलीक असतांना ही औरगजेबाच्या काळात चंद्रपूर राज्यात गोवध बंदी कायदा लागू केला.[42] याचे औरगजेबला वाईट वाटले.

**4) राणी हिराईची बांधकामे :-**

राणी हिराईने आपल्या काळात फक्त लढायाच न करता जनकल्याणाच्या दृष्टीकोनातून अनेक बाधकामे केली. त्या अनेक मंदीरे बांधली विशेषता चंद्रपूरचे महाकाली मंदीर, अंचलेश्वर मंदीर, खटीचा गणपती, गोरजाई मंदीर, एकवीरा मंदीर, महादेव मंदीर, राममंदीर इत्यादी मंदीराची बांधकाम राणीने केली.[43]

तसेच विहीरी व तलावची निर्मिती ही केली त्यात घुटकाळा तलाव, शंखाकृती विहीर, माणीकगड किल्ल्याची दुरुस्ती व मार्कडा येथील मंदीराचा जिर्णोध्दार इत्यादी कामे राणी हिराईच्या काळात झाली तसेच पतीच्या प्रेमापोटी राणा बीरशहाची समाधी हडवाड्यात तयार करुन त्यावर कोरीव काम केले. ही समाधी शिल्पकलाचा उत्कृष्ट नमुना आहे.[44] जनतेला पिण्याच्या पाण्याची व्यवस्था म्हणून अनेक हतनी (हौद) निर्माण केले. परंतु अजूनही राणीच्या कर्तुत्वाबद्दल व कार्याची बरीच माहिती उजेडात आली नाही. त्यासंदर्भात साधने उपलब्ध झाली तर राणी हिराईच्या ख-या कार्याचा दखल इतिहासात घेतली जाईल असे म्हणता येईल.

**मुल्यमापन/योग्यता –**

राणी हिराईच्या मृत्युबद्दल निश्चित माहिती मिळत नाही तरीपण इ.स. 1725-26 च्या दरम्यान केव्हातरी राणीचा मृत्यु झाला असावा. राणी हिराई च्या अंगी दूरदर्शीपणा, चतुर, राजकारणी, मत्सद्दी, व्यवहार कुशाल, जणकल्याणकारी इत्यादी अनेक गुण असून ती पराक्रमी धाडसी व शुर होती. तसेच ती उत्कृष्ठ प्रशासकही होती. मुलगा 3 वर्षाचा असल्यामुळे तीन संपुर्ण कारभार आपल्या हाती ठेऊन जवळपास 15 वर्ष राज्यकारभार योग्य रित्या करुन जनहिताची कामेही केली यावरुन ती उत्कृष्ठ प्रशासन ठरते.

ती स्वाभीमानी स्त्री असून आपल्या मुलीच्या अपमानाचा बदला घेण्यासाठी प्रत्यक्ष जावयाला ठार मारण्यासाठी तीने मागे पुढे पाहिले नाही. अशी सासू इतिहासात सापडणे दुर्मिळच आहे. तीचे पतीवर प्रेम असून त्याच्या साठी ती शत्रूच्या गोटातून त्याला सोडवून आणण्यासही मागेपुढे न पाहता. त्याला दुसरे लग्न करण्याचाही सल्ला देत. यावरुन तिच्यातील [illegible]ागी वृत्ती दिसुन येते. तसेच पती प्रेमासाठी बांधलेली बीरशहाची समाधी हे इतिहासातील एकमेव उदाहरण सांगता येईल.

राणी हिराई ची व्यवहारी व मुत्सध्दी असल्यामुळेच तीने शाहुला दिलेले अर्धेराज्य परत मिळाविले. तसेच ती शुर व उत्कृष्ट सैनानी असल्यामुळे नेकनामखान व कान्होजी भोसले सारख्या मातब्बर सरदारांचा पराभव करु शकली यावरुन तिच्यातील नेतृत्व गुण लक्षात येते तसेच जनतेच्या प्रमापोटी तलाव, विहीर ओलीताच्या सोयी, गोवध बंदी, भीक मागण्यास बंदी इत्यादी कायदे व सोयी केल्यामुळे जनतेची पणिबा राणीला मिळाला व 20 वर्ष तीला राज्यकारभार करता आला यावरुन तीच्यातील योग्यता कळते सामाजीक सुधारणा, बाधिलकी, प्रजा वस्तल राज्यकर्ती, कर्तुत्ववान राणी म्हणून तीचा गौरव करता येईल.



Scanned with OKEN Scanner

अजूनही राणीच्या कर्तुत्वाबद्दल कार्याची बरीच माहिती उजेडात आली नाही. त्यासंदर्भात साधने उपलब्ध झाली तर राणी हिराईच्या खऱ्या कार्याचा दखल इतिहासात घेतली जाईल असे म्हणता येईल.

**संदर्भग्रंथ सुची –**

1) राजूरकर अ.ज. 'चंद्रपूरचा इतिहास', शारदा प्रकाशन, चंद्रपूर, 1956.
2) आत्राम उषाकिरण, 'गोंडवाना कि महान विरांगणारे' गोडवाना गोंडी साहित्य परिषद, राजनांदगाव, 2005.
3) तन्नारवार दत्ता, 'कर्तुत्वशालीनी महाराणी हिराई', बाबू आयटम प्रकाशन, चंद्रपूर, 2016.
4) साप्ताहिक-चंद्रपूर पत्रिका, दिवाळी अंक, 2008.
5) सरदेसाई गो.स. "मराठी रियासत भाग-3", पापुलर प्रकाशन, मुंबई, 1989.
6) गद्रे डॉ. प्रभाकर, "मध्ययुगीन चंद्रपूर", श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, 2012.
7) कोलारकर डॉ. श.गो., "विनायकराव औरंगाबाद कर यांची नागपूरकर भोसल्यांची विस्तृत बखर", श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, 2007.
8) Begbie L.F(ed), 'Gazeteer of chanda District in central provinces', Glan Publishing House, Delhi, 1986.

Assistant Professor
Lokmanya Mahavidyalaya, Warora
Dist. Chandrapur



प्रा. डॉ. दीपक पा. लोणकर

Scanned with OKEN Scanner